

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटुसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ९९ वा | सोमवार, दि. १६ नोव्हेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: – SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

ऊसदरासाठी शेतकऱ्यांचा एल्गार !

जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार भव्य मोर्चा

प्रतिटन ४२०० रुपये दराची मागणी; पहिली उचल ३५०० रुपये देण्याचा आग्रह

उजनीच्या पाण्यासाठीही शेतकरी आक्रमक; जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटना एकवटल्या

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसदराचा प्रश्न आता चांगलाच पेटला असून, साखर कारखानदारांच्या दर धोरणाविरोधात शेतकरी संघटना आक्रमक झाल्या आहेत. कोल्हापूर जिल्ह्याच्या धर्तीवर सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन ४२०० रुपये दर मिळावा, तसेच पहिली उचल ३५०० रुपये द्यावी, या प्रमुख मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आज, सोमवार (दि. १६ नोव्हेंबर) रोजी सकाळी ११ वाजता सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या माध्यमातून ऊसदरासह उजनीच्या पाण्याचा आणि वीजपुरवठ्याचा प्रश्नही ऐरणीवर आणला जाणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादकांना कोल्हापूर जिल्ह्याच्या तुलनेत प्रतिटन तब्बल १२०० ते १३०० रुपयांनी कमी दर मिळत असल्याचा आरोप शेतकरी संघटनांकडून केला जात आहे. एकीकडे उत्पादन खर्चात सातत्याने







वाढ होत असताना दुसरीकडे साखर कारखानदारांकडून तुटपुंजी उचल जाहीर केली जात असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. जिल्ह्यातील साखर कारखान्यांकडून ऊसदराची एकरकमी आणि समाधानकारक घोषणा होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

या प्रश्नावर शेतकरी संघटनांनी पक्षीय राजकारण, गट-तट बाजूला ठेवून एकत्रित लढा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. पंढरपूर येथे झालेल्या सर्व शेतकरी संघटनांच्या बैठकीत मोचार्चे नियोजन करण्यात आले. सोलापुरातील चार पुतळा येथून मोर्चाला सुरुवात होणार असून, जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

उजनीच्या पाण्याचा प्रश्नही आंदोलनाच्या केंद्रस्थानी

यंदा पावसाअभावी आणि पाणीटंचाईमुळे ऊस उत्पादक शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. उजनी धरणातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याच्या निर्णयामुळे भीमा नदीकाठच्या हजारो हेक्टरवरील ऊसशेती धोक्यात आली आहे. नदीकाठच्या शेतकऱ्यांना वेळेवर पाण्याची पाळी मिळत नसून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे उभे पीक वाचवणेही कठीण झाले आहे. दक्षिण सोलापूर भागात म्हैसाळ योजनेच्या पाण्याबाबतही अशीच परिस्थिती असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

सर्व संघटना एकवटल्या; तरुणांना सहभागी होण्याचे आवाहन

या आंदोलनासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना, रयत क्रांती संघटना, बळीराजा शेतकरी संघटना, क्रांतिकारी शेतकरी संघटना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्रित भूमिका घेतली आहे. दीपक भोसले, तानाजी बागल, समाधान फाटे, सचिन पाटील, माऊली जवळेकर, अनिल बागल, सुभाष शिंदे, शेखर आटकळे, निवास नागणे, विक्रम जगदाळे, चंद्रकांत बागल यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी बैठकीला उपस्थित होते.

ऊसदराचा प्रश्न हा केवळ एका संघटनेचा किंवा एका तालुक्याचा प्रश्न नसून संपूर्ण जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक अस्तित्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे पक्षीय मतभेद बाजूला ठेवून शेतकरी, तरुण आणि सर्व संघटनांनी एकजुटीने या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

'४२०० रुपये दर मिळालाच पाहिजे, अन्यथा संघर्ष तीव्र करणार', असा निर्धार व्यक्त करत शेतकरी संघटनांनी आजच्या मोचार्ची जोरदार तयारी केली आहे. या आंदोलनातून प्रशासन आणि शासन शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत काय भूमिका घेते, तसेच साखर कारखानदारांवर दर जाहीर करण्यासाठी किती दबाव निर्माण होतो, याकडे आता संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

ऊस पिकासाठी मोठा खर्च, मेहनत आणि आर्थिक गुंतवणूक करूनही पाण्याअभावी पीक जळण्याची वेळ आली आहे. त्यामुळे उजनी धरणातून शेतीसाठी तातडीने पाणी सोडावे, पाणीटंचाईमुळे जळालेल्या ऊस पिकांचे पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशा मागण्याही मोचार्तून करण्यात येणार आहेत.

जनजागृती सभांना शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

मोर्चाच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते सचिन पाटील, जिल्हा संघटक युवराज घुले, काँग्रेसचे शहराध्यक्ष ॲड. राहुल घुले, तालुकाध्यक्ष श्रीमंत केदार, माजी तालुकाध्यक्ष अनिल बिराजदार, शंकर संगशेट्टी, रणजित पवार यांच्यासह कार्यकर्त्यांनी तालुक्यातील गावोगावी जाऊन जनजागृती केली. मुढवी, उचेठाण, बठाण, ब्रह्मपुरी, नंदूर, अरळी, बोराळे, मरवडे आणि सिद्धापूर येथे झालेल्या सभांना शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

तालुक्यात चार साखर कारखाने असतानाही दरवर्षी ऊसदरासाठी आंदोलन करण्याची वेळ शेतकऱ्यांवर का येते, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. दामाजी कारखाना वगळता अन्य तीन खासगी कारखान्यांकडे को-जनरेशन आणि डिस्टिलरीसारखे पूरक प्रकल्प असतानाही शेतकऱ्यांना समाधानकारक दर मिळत नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली.

मोर्चातील प्रमुख मागण्या

- कोल्हापूरच्या धर्तीवर ऊसाला प्रतिटन ४२०० रुपये दर जाहीर करावा.
- पहिली उचल प्रतिटन ३५०० रुपये द्यावी.
- ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एकरकमी आणि योग्य दर मिळण्याची व्यवस्था करावी.
- भीमा नदीकाठची उभी ऊसशेती वाचविण्यासाठी उजनी धरणातून शेतीसाठी तातडीने पाणी सोडावे.
- पाणीटंचाईमुळे जळालेल्या ऊस पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी.
- ऊस बिलाची रक्कम वेळेत अदा करावी.

कारखानदारांविरोधात शेतकऱ्यांचा संताप

गाळप हंगाम सुरू होऊन महिना उलटत आला तरी काही कारखानदारांकडून ऊसदर आणि बिलाच्या रकमेबाबत स्पष्ट भूमिका जाहीर केली जात नसल्याचा आरोप शेतकरी नेत्यांनी केला आहे. ऊस गाळपासाठी पाठविल्यानंतर १५ दिवसांत बिल देण्याची अपेक्षा असताना महिनाभर उलटूनही रकमेबाबत अनिश्चितता कायम असल्याने शेतकरी संतप्त आहेत. पाणी आणि वीजटंचाईमुळे शेतकऱ्यांना नाइलाजाने कारखान्यांकडे ऊस पाठवावा लागत असून, याच परिस्थितीचा गैरफायदा घेतला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

पंढरपूर विहीर दुर्घटनेत बचावकार्याला वेग

भाजप नेत्यांनी आधीच वाहिली श्रद्धांजली

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील आंबे गावात दुर्दैवी घटना घडली आहे. शेतात विहीर खोदण्याचे काम सुरू असताना अचानक विहीर कोसळल्याने चारजण मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकले.

गेल्या सात तासांपासून याठिकाणी बचावकार्य सुरु आहे. सोलापूरचे सध्याचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी श्री. एस. कार्तिकेयन हे स्वतः घटनास्थळी उपस्थित असून त्यांना वाचवण्याचे शथीर्चे प्रयत्न सुरु आहेत.

नेमकं काय घडलं?

याबाबत सविस्तर माहिती अशी की, पंढरपुर तालुक्यातील आंबे येथे निवास शिंदे या शेतकऱ्याच्या शेतात विहीर खोदण्याचे काम सुरू होते. विहीर खोदताना अचानक दगड मातीचा ढिगारा काम करणाऱ्या कामगारांच्या अंगावर कोसळला. कामगारांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही. हे कामगार सध्या दगड, मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकल्याचं सांगितलं जात आहे, या सर्वांना वाचवण्यासाठी गेल्या तास तासांपासून प्रयत्न सुरु आहेत.



कामगारांना वाचवण्यासाठी प्रयत्न सुरु

सोलापूरचे सध्याचे जिल्हाधिकारी श्री. एस. कार्तिकेयन तसेच माढ्याचे आमदार अभिजीत पाटील हे घटनास्थळी उपस्थित आहेत. या मजुरांना वाचवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. याठिकाणी एनडीआरएफचे पथकही दाखल होणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन यांनी दिली आहे. तसेच विठ्ठलाच्या कृपेने सर्व कामगार सुखरुप असावेत अशी भावना आमदार अभिजित पाटील यांनी व्यक्त केली आहे.

भाजप नेत्यांनी वाहिली श्रद्धांजली!

दरम्यान, एकीकडे कामगारांना जिवंत वाचवण्याचे प्रशासनाचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती जिल्हाधिकारी देत आहेत तर दुसरीकडे घटनेबाबत जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह भाजप नेत्यांनी मात्र असंवेदनशीलता दाखवल्याचे समोर आले आहे. कामगारांचे बचावकार्य सुरु असतानाच भाजप नेत्यांनी मात्र कामगारांच्या मृत्यूची घोषणा केली तसेच सोशल मीडियावरुन श्रद्धांजलीही वाहिली.

भाजपाचे मंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्यासह भाजप तालुका अध्यक्ष सुभाष मस्के, भाजपाचे माऊली हळनवर व पदाधिकाऱ्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून या पदाधिकाऱ्यांना श्रद्धांजली वाहिली. चूक लक्षात आल्यानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आपली पोस्टही डिलिट केली.

मोहोळ नागरी सहकारी पतपुरवठा संस्थेच्या वतीने जिल्हा सरकारी वकील ॲंड.कुर्डुकर, प्रा.देशपांडे व उद्योजक थिटे यांचा गौरव

मोहोळ (कटूसत्य वृत्त) :- दीपावली सणाचे औचित्य साधून सामाजिक, शैक्षणिक, विधी आणि औद्योगिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष तथा मोहोळचे माजी आमदार राजन पाटील व सौ. राजश्री राजन पाटील (भाभीसाहेब) यांच्या शुभहस्ते जिल्हा सरकारी वकील ॲंड. आनंद कुर्डुकर व त्यांच्या पत्नी सौ.कुर्डुकर, प्रा. दिलीप देशपांडे तसेच उद्योजक विष्णू थिटे व त्यांच्या पत्नी सौ.थिटे यांचा सन्मान करण्यात आला.







डॉ. कौशिक (तात्या) गायकवाड यांच्या संकल्पनेतून मोहोळ नागरी सहकारी पतपुरवठा संस्था आणि कौशिक तात्या मित्र परिवाराच्या वतीने या विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दीपावलीच्या आनंदोत्सवात कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याबरोबरच जुन्या ऋणानुबंधांना उजाळा देण्याचा उपक्रम यानिमित्ताने घडून आला.

या कार्यक्रमात जिल्हा सरकारी वकील ॲंड. आनंद कुर्डुकर आणि त्यांच्या पत्नी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी राजन पाटील आणि ॲंड. कुर्डुकर यांनी गतकाळातील अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्यांच्या संवादातून अनेक वर्षांपासून जपलेले स्नेहसंबंध आणि परस्परांमधील जिव्हाळा अनुभवायला मिळाला. केवळ औपचारिक (पान 2 वर..)

५०० कोटींच्या ऑडिओ क्लिपचे गूढ गडद; जरांगेंचा शिंदेंना थेट सवाल!

'क्लिप खरी आहे, माझ्याकडे स्फोटक पुरावे'; संबंधित महिलेबाबतही केला मोठा दावा

मुंबई (कटूसत्य वृत्त): राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या ५०० कोटी रुपयांच्या कथित ऑडिओ क्लिप प्रकरणाने आता वेगळेच वळण घेतले आहे. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी या क्लिपवरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना थेट लक्ष्य करत, या प्रकरणातील सत्य जनतेसमोर आणण्याचे आव्हान दिले आहे. विशेष म्हणजे, संबंधित ऑडिओ क्लिप बनावट नसून खरी असल्याचा ठाम दावा करत जरांगेंनी 'त्या बाई'च्या भूमिकेबाबतही गंभीर विधान केले आहे. त्यामुळे या प्रकरणाचे गूढ अधिकच वाढले आहे.

जरांगे पाटील यांनी एकनाथ शिंदे यांच्या मौनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कोणताही गैरव्यवहार केला नसेल, तर सत्य बाहेर येण्याची भीती कशाला? असा सवाल करत त्यांनी शिंदेंना या प्रकरणाच्या मुळाशी जाण्याचा सल्ला दिला. संबंधित ऑडिओ क्लिपमधील महिला अत्यंत आत्मविश्वासाने बोलत असल्याचे सांगत, दिल्लीतील सूत्रांकडूनही ही क्लिप खरी असल्याची माहिती मिळत असल्याचा दावा त्यांनी केला. मात्र, या दाव्यांना अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

एसआयटी स्थापनेवरही संशयाची सुई!

या प्रकरणाच्या तपासावरही जरांगे यांनी आक्षेप घेतला



आहे. अधिकृत गुन्हा दाखल होण्यापूर्वीच विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना होणे ही असामान्य बाब (पान 2 वर..)



कार्तिकी वारीच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाची धडक तपासणी

पंढरपुरातील १२ आस्थापनांची तपासणी; खाद्यपदार्थांचे १८ नमुने विश्लेषणासाठी घेतले

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- कार्तिकी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथे येणाऱ्या लाखो भाविकांना सुरक्षित, स्वच्छ व दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत पंढरपूर शहरात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान शहरातील हॉटेल्स, मिठाई दुकाने, फरसाण केंद्रे, खानावळी व प्रसाद विक्री केंद्रांसह एकूण १२ आस्थापनांची अचानक तपासणी करण्यात आली. तसेच विविध खाद्यपदार्थांचे १८ नमुने प्रयोगशाळेतील विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत.

कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने देशाच्या विविध भागांतून लाखो वारकरी व भाविक पंढरपूर येथे दाखल होतात. या काळात भाविकांना भेसळयुक्त, निकृष्ट दजार्चे किंवा अस्वच्छ वातावरणात तयार केलेले अन्नपदार्थ विकले जाऊ नयेत, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घेतली आहे. तपासणीदरम्यान अन्नपदार्थांची साठवणूक, परिसरातील स्वच्छता, खाद्यपदार्थ तयार करण्याची पद्धत, वापरण्यात येणारे खाद्यतेल, कृत्रिम रंग तसेच इतर घटकांच्या गुणवत्तेची पाहणी करण्यात आली.

नमुने निकृष्ट आढळल्यास कठोर कारवाई

तपासणीदरम्यान घेण्यात आलेल्या १८ नमुन्यांचे प्रयोगशाळेत विश्लेषण करण्यात येणार आहे. त्यांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर अन्नपदार्थ निकृष्ट दजार्चे किंवा भेसळयुक्त असल्याचे आढळल्यास संबंधित आस्थापनांविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

वारी कालावधीत सर्व अन्न व्यावसायिकांनी अन्नपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता आणि सुरक्षिततेचे निकष काटेकोरपणे पाळावेत. भाविकांच्या आरोग्याशी संबंधित कोणतीही हयगय करू नये, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त साहेबराव देसाई यांनी केले आहे.

दरम्यान, वारीच्या कालावधीत अन्नपदार्थांच्या दजार्बाबत किंवा भेसळीबाबत काही तक्रार असल्यास नागरिकांनी अन्न व औषध प्रशासनाच्या टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर संपर्क साधावा. तसेच ऑनलाइन ऋ्रल्ळ तक्रार पोर्टलवरही तक्रार नोंदविता येणार आहे.



संपादकीय

सहकारातील असहकार

महाराष्ट्रातील सर्वात मोठा सहकारी तत्त्वावरील दूध उत्पादक प्रकल्प असलेल्या कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या म्हणजेच 'गोकुळ'च्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या निमित्ताने सहकार क्षेत्रात जे राजकारण शिरले आहे त्याचे वर्णन केवळ 'सहकारातील असहकार' या शब्दातूनच करता येईल.

राजधानी दिल्लीपासून देशातील कोणत्याही गल्लीपर्यंत आपलीच सत्ता असावी या हेतूने सातत्याने कार्यरत असलेल्या भाजपाच्या निवडणूकप्रिय राजकारणाचे ताजे उदाहरण म्हणून गोकुळच्या या संघर्षाकडे पहावे लागणार आहे.

भाजप आणि त्यांचे मित्र पक्ष असलेल्या महायुतीने गोकुळच्या संचालकपदाच्या निवडणुकीत सर्व ताकद पणाला लावूनही काँग्रेसप्रणित सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील आघाडीने तेथे बहुमत मिळवले. कोल्हापूर जिल्ह्यातील हजारो दूध उत्पादक सभासदांनी बंटी पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवला. पण तरीही या गोकुळ दूध संघाचे अध्यक्षपद काँग्रेसप्रणित आघाडीला मिळू नये या दृष्टिकोनातून गेल्या काही दिवसांपासून हालचाली सुरू झाल्या आहेत.

25 जागांसाठी झालेल्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत काँग्रेसप्रणित आघाडीने 13 आणि महायुतीप्रणित आघाडीने 12 जागा जिंकल्या. काँग्रेसप्रणित आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले. पण अध्यक्षपदाच्या निवडीसाठी घेण्यात आलेल्या विशेष बैठकीमध्ये कोरमचा मुद्दा समोर आल्याने अध्यक्षपदाची निवड झाली नाही. महायुतीप्रणित आघाडीने अध्यक्षपद निवडीसाठी आयोजित बैठकीवर बहिष्कार घातल्याने हा कोरमचा प्रश्न निर्माण झाला.

त्यानंतर राज्य सरकारने मंत्रिमंडळाच्या तातडीच्या बैठकीमध्ये पाच नामनियुक्त संचालकांच्या नावाची घोषणा करून त्यापैकी चार संचालकांना अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार प्रदान केला.सरळ सरळ लोकांनी ज्या आघाडीवर मतदानाच्या माध्यमातून विश्वास दर्शवला आहे, त्या आघाडीला अध्यक्षपद मिळू नये यासाठी सत्ताधारी पक्षाने केलेली ही मागच्या दाराची खेळी आहे.सरकार सहकारी संस्थांवर नामनियुक्त सदस्यांची नियुक्ती करू शकते, याबाबत कोणालाही आक्षेप नाही.

पण अशा नामनियुक्त सदस्यांना अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार मिळतो का, हाच वादाचा मुद्दा आहे. अनेक माजी न्यायाधीश आणि सहकार कायद्यातील तज्ज्ञ यांनीसुद्धा सरकारच्या या निर्णयाला विरोध दर्शवला आहे. न्यायालयीन पातळीवर हा निर्णय टिकणार नाही असे सांगितले आहे. पण सरकारने केलेल्या खुलाशाप्रमाणे गोकुळमधील पेचप्रसंग संपवण्यासाठी सरकारला हा निर्णय घ्यावा लागला आहे. नामनियुक्त केलेल्या चार सदस्यांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाल्यानंतर आपोआपच विरोधी पक्षांचा अध्यक्ष होणार आहे हे उघड आहे.

म्हणजेच कोल्हापुरातील दूध उत्पादक मतदारांनी ज्या आघाडीवर विश्वास ठेवून मतदान केले त्या आघाडीचा अध्यक्ष होणार नाही. त्यालाच सर्वांचा विरोध आहे आणि म्हणूनच बंटी पाटील यांनी सोमवारी संघर्ष मोचार्चेही आयोजन केले आहे. अर्थात सतत साम-दाम-दंड-भेद या सर्व उपायांचा अवलंब करून सत्ता मिळवण्याच्या प्रयत्नात असलेल्या भाजपाच्या राजनीतीवर या मोचार्चा काही परिणाम होईल असे दिसत नाही. खरे तर केंद्रीय पातळीवर नव्यानेच निर्माण करण्यात आलेल्या सहकार खात्याचे प्रमुख अमित शहा हेच आहेत.

केंद्रीय पातळीवरील सहकार खात्याचे नेतृत्व करर्णाया अमित शहा यांनी हिरवा कंदील दिल्याशिवाय राज्य पातळीवरील नेत्यांनी नामनियुक्त संचालकांच्या नियुक्तीचा मुद्दा समोर आणला असेल असे वाटत नाही.

गोकुळसारखी सर्वात मोठी दूध संस्था अमूल सारख्या दुर्सया एका मोठ्या संस्थेच्या घशात घालण्यासाठी हे सर्व कारस्थान सुरू आहे, अशा प्रकारचे आरोप केले जात असले तरी तो नंतरचा चचेर्चा विषय आहे. मुळात लोकशाही मार्गाने सत्ता मिळवलेल्या संचालकांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी अशा प्रकारचे मार्ग अवलंबता येतात का हाच सर्वात चचेर्चा आणि वादाचा विषय ठरला आहे.

महाराष्ट्रसारखा राज्यामध्ये दीर्घकाळ सहकाराच्या माध्यमातूनच राजकारणाची पेरणी झाली आहे. सहकार क्षेत्रात मोठे काम केलेले नेतेच नंतर मुख्यमंत्री, मंत्री किंवा आमदार, खासदार झाले आहेत, यात दुमत असण्याचे कारण नाही.

राज्यात दीर्घकाळ या सहकार क्षेत्रावर भाजपाचा अजिबात प्रभाव नव्हता. आता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका असोत किंवा जिल्हा परिषदा असो गोकुळसारखे सहकारी दूध संघ असोत, या संस्थांमध्ये कोणत्याही प्रकारे सत्ता मिळवण्यासाठी भाजपाच्या हालचाली सुरू आहेत. याचे ताजे उदाहरण म्हणून गोकुळच्या संघर्षाकडे पाहावे लागते.

काँग्रेसप्रणित आघाडीने आधीच सरकारच्या निर्णयाला आव्हान दिले आहे. 'विना सहकार नाही उद्धार' या बोधवाक्याच्या माध्यमातून राज्यातील सहकार क्षेत्र पुढे जात असले तरी सध्या या सहकाराच्या माध्यमातून असहकाराचेच बीज पेरले जाण्याचे संकेत मिळू लागले आहेत, जे आगामी कालावधीसाठी निश्चितच घातक आहेत. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला ज्या सहकार क्षेत्राने बळकटी दिली आहे त्या सहकार क्षेत्रामध्ये अशा प्रकारचे असहकाराचे राजकारण येणे मुळीच शोभनीय नाही.

पान १ वरून

५०० कोटींच्या ऑडिओ क्लिपचे गूढ गडद...

असल्याचे त्यांनी म्हटले. संबंधित व्यक्ती सत्ताधारी पक्षाशी संबंधित असल्यामुळेच कारवाई टाळली जात आहे आणि क्लिप खोटी ठरविण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असा गंभीर आरोपही त्यांनी केला. एखादा सामान्य नागरिक अशा प्रकरणात अडकला असता, तर त्याच्यावर आतापर्यंत कारवाई झाली असती, अशी टीका त्यांनी केली.

'वेळ आल्यावर पुरावे बाहेर काढणार'

या प्रकरणाशी संबंधित अनेक महत्त्वाचे पुरावे आणि स्फोटक माहिती आपल्याकडे असल्याचा दावा जरांगे पाटील यांनी केला आहे. योग्य वेळ येताच हे पुरावे जनतेसमोर मांडणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे त्यांच्या पुढील भूमिकेकडे राजकीय वतुर्ळाचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, आपल्याविरोधात षडयंत्र रचले जात असल्याचा आरोप करत जरांगे यांनी शिंदेंना वेळीच हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले. इतरांचे राजकीय अस्तित्व टिकविण्यात शिंदे यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगत, त्यांनी या प्रकरणाचा निष्पक्ष आणि सखोल तपास करावा, अशी मागणी केली.

एकूणच, ५०० कोटींच्या कथित ऑडिओ क्लिपमधील सत्य काय, संबंधित महिलेची नेमकी भूमिका काय आणि या प्रकरणात कोणाचे हितसंबंध गुंतले आहेत, असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. जरांगेंनी पुरावे उघड करण्याचा दिलेला इशारा आणि शिंदेंच्या मौनावर केलेली टीका यामुळे आगामी काळात या प्रकरणाचे राजकीय पडसाद आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. मात्र, ऑडिओ क्लिपची सत्यता आणि आरोपांची पुष्टी अधिकृत तपासातूनच स्पष्ट होणार आहे.

सहिष्णुता : सामाजिक ऐक्य आणि मानवतेचा आधार

दरवर्षी १६ नोव्हेंबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन' म्हणून साजरा केला जातो. विविध धर्म, भाषा, संस्कृती, परंपरा, विचारधारा आणि जीवनपद्धती असलेल्या समाजघटकांमध्ये परस्पर आदर, समजूतदारपणा, स्वीकारशीलता आणि बंधुभाव निर्माण व्हावा, हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे. मानवसमाजाची रचना विविधतेवर आधारलेली आहे. प्रत्येक व्यक्तीचे विचार, श्रद्धा, आवडीनिवडी, जीवनशैली आणि सामाजिक अनुभव वेगवेगळे असतात. ही विविधता समाजाचे वैभव असते. मात्र, या विविधतेचा स्वीकार करण्याऐवजी तिच्याकडे संशयाने, तुच्छतेने किंवा द्वेषाच्या भावनेने पाहिले, तर सामाजिक संघर्ष, भेदभाव आणि हिंसाचाराला खतपाणी मिळते. म्हणूनच शांततापूर्ण, न्याय्य आणि समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी सहिष्णुता हे अत्यंत महत्त्वाचे मानवी मूल्य आहे. सहिष्णुता म्हणजे केवळ दुसऱ्याचे विचार सहन करणे नव्हे, तर त्याच्या वेगळेपणाचा आदर करून त्याला सन्मानाने जगण्याचा अधिकार मान्य करणे होय.

आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिनाच्या संकल्पनेला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनेने (युनेस्को) १९९५ हे वर्ष सहिष्णुतेसाठी आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून घोषित केले होते. त्याच वर्षी १६ नोव्हेंबर रोजी युनेस्कोच्या सदस्य राष्ट्रांनी 'सहिष्णुतेच्या तत्त्वांविषयीची घोषणा' स्वीकारली. या घोषणेमध्ये सहिष्णुतेला शांतता, लोकशाही, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय यांचा महत्त्वपूर्ण आधार मानण्यात आले. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने १९९६ मध्ये १६ नोव्हेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन म्हणून पाळण्याचे आवाहन केले. जगभरातील समाजांमध्ये वाढणारा धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक आणि वैचारिक संघर्ष कमी करून परस्पर समजूतदारपणा वाढविणे, हा या दिवसाचा व्यापक हेतू आहे. त्यामुळे हा दिवस केवळ औपचारिक उत्सव नसून मानवतेच्या मूल्यांचा पुनर्विचार करण्याची आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारी संधी आहे.

सहिष्णुता ही संकल्पना व्यापक आणि बहुआयामी आहे. व्यक्तीचे विचार आपल्यापेक्षा वेगळे असू शकतात, तिची धार्मिक श्रद्धा आपल्यापेक्षा भिन्न असू शकते किंवा तिची जीवनशैली आपल्या परंपरेशी जुळणारी नसू शकते. मात्र, या कारणांमुळे त्या व्यक्तीचा अवमान करणे, तिच्यावर बंधने लादणे किंवा तिच्या अधिकारांचे उल्लंघन करणे योग्य ठरत नाही. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे विचार मांडण्याचे, श्रद्धा बाळगण्याचे, संस्कृतीचे पालन करण्याचे आणि सन्मानाने जगण्याचे स्वातंत्र्य आहे. या स्वातंत्र्याचा आदर करणे म्हणजे सहिष्णुता. सहिष्णुता ही दुर्बलता नसून मानसिक परिपक्वता, विवेकशीलता आणि आत्मविश्वासाचे प्रतीक आहे. स्वतःच्या मतांवर ठाम राहूनही दुसऱ्याच्या मतांचा आदर करता येणे, ही खऱ्या अर्थाने सहिष्णु वृत्ती होय. अर्थात, सहिष्णुता म्हणजे अन्याय, शोषण, हिंसा, अत्याचार किंवा मानवी हक्कांचे उल्लंघन मुकाटपणे सहन करणे नव्हे. अन्यायाविरुद्ध आवाज उठविताना मानवी प्रतिष्ठेचा आदर राखणे आणि विवेकपूर्ण मार्गाने संघर्ष करणेही तितकेच आवश्यक आहे.

भारतीय समाजाच्या रचनेमध्ये सहिष्णुतेला विशेष महत्त्व आहे. भारत हा विविध धर्म, भाषा, जाती, जमाती, संस्कृती आणि परंपरांनी समृद्ध असलेला देश आहे. देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये राहणाऱ्या लोकांचे राहणीमान, खाद्यसंस्कृती, वेशभूषा, सण-उत्सव आणि सामाजिक चालीरीती वेगवेगळ्या आहेत. तरीही या विविधतेमध्ये एकात्मतेची भावना टिकून आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार, धर्मस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार प्रदान केले आहेत. संविधानाच्या प्रास्ताविकेमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा स्वीकार करण्यात आला आहे. ही मूल्ये सहिष्णुतेच्या पायावर उभी आहेत. धर्म, भाषा, जात, लिंग किंवा जन्मस्थान यांच्या आधारावर कोणताही नागरिक कनिष्ठ ठरू नये, ही भारतीय लोकशाहीची मूलभूत भूमिका आहे. त्यामुळे सहिष्णुता ही केवळ वैयक्तिक सद्गुणाची बाब नसून भारतीय संविधानिक लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक असलेले सामाजिक मूल्य आहे.

भारतीय इतिहासात विविध विचारप्रवाह, तत्त्वज्ञान आणि सामाजिक चळवळींनी सहिष्णुतेची शिकवण दिलेली आहे. तथागत गौतम बुद्धांनी करुणा, मैत्री, प्रज्ञा आणि अहिंसेच्या माध्यमातून मानवतेचा संदेश दिला. व्यक्तीने विवेकाचा वापर करून सत्याचा शोध घ्यावा आणि सर्व प्राणिमात्रांविषयी करुणेची भावना ठेवावी, हा त्यांच्या विचारांचा गाभा होता. सम्राट अशोकाने कलिंग युद्धानंतर हिंसेचा त्याग करून धम्मविजयाचा मार्ग स्वीकारला. विविध धार्मिक संप्रदायांविषयी आदर बाळगण्याचा आणि परस्परांचा सन्मान करण्याचा संदेश त्याने दिला. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर, संत नामदेव आणि इतर संतपरंपरेतील विचारवंतांनी समता, बंधुभाव आणि मानवतेचे महत्त्व अधोरेखित केले. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक विषमता, जातिभेद आणि स्त्रीशिक्षणावरील बंधने यांविरुद्ध संघर्ष केला. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्याय आणि समतेसाठी कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीचा विचार मांडला. या सर्व विचारवंतांच्या कार्यातून सहिष्णुता, सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व स्पष्ट होते.

सहिष्णुतेचा महत्त्वाचा पैलू म्हणजे धार्मिक आणि सांस्कृतिक विविधतेचा आदर. प्रत्येक व्यक्तीला आपापल्या श्रद्धेनुसार जीवन जगण्याचा अधिकार आहे. धार्मिक श्रद्धा ही व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनाचा भाग असली, तरी तिचा वापर दुसऱ्या व्यक्तीविषयी द्वेष निर्माण करण्यासाठी होऊ नये. कोणताही धर्म मानवतेपेक्षा मोठा नाही आणि कोणतीही धार्मिक ओळख दुसऱ्या व्यक्तीचा अपमान करण्याचा अधिकार देत नाही. धार्मिक विविधतेचा स्वीकार करून परस्परांच्या सण-उत्सवांमध्ये सहभागी होणे, एकमेकांच्या परंपरांची माहिती घेणे आणि सामाजिक सलोखा टिकविणे आवश्यक आहे. सांस्कृतिक सहिष्णुतेमुळे विविध समुदायांमधील अंतर कमी होते. लोक एकमेकांच्या जीवनपद्धती समजून घेतात आणि परस्परांविषयी विश्वास निर्माण होतो. त्यामुळे सामाजिक ऐक्य अधिक बळकट होते.

भारतीय समाजात भाषिक सहिष्णुतेलाही विशेष महत्त्व आहे. भारतामध्ये अनेक भाषा आणि बोलीभाषा बोलल्या जातात. प्रत्येक भाषेला स्वतःचा इतिहास, साहित्य, संस्कृती आणि सामाजिक वारसा आहे. कोणतीही भाषा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते. मातृभाषेचा अभिमान बाळगताना इतर भाषांचा अवमान होऊ नये. भाषिक विविधतेचा स्वीकार केल्याने सांस्कृतिक देवाणघेवाण वाढते आणि राष्ट्रीय एकात्मतेला बळ मिळते. त्याचप्रमाणे आदिवासी समाजाच्या भाषा, बोली, लोककला, परंपरा आणि ज्ञानपद्धती यांचे जतन करणे हीदेखील सहिष्णुतेची व्यापक अभिव्यक्ती आहे. वारली, भिल्ल, कोकणा आणि इतर आदिवासी समुदायांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांकडे मागासलेपणाच्या दृष्टिकोनातून न पाहता त्यांना समाजाच्या सांस्कृतिक संपत्तीचा भाग मानले पाहिजे. विविधतेचा आदर करणारा समाजच खऱ्या अर्थाने समावेशक आणि प्रगतिशील ठरतो.

आजच्या काळात जातीय आणि सामाजिक सहिष्णुतेची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. भारतीय समाजात जात, वर्ग, लिंग, आर्थिक स्थिती आणि सामाजिक प्रतिष्ठा यांच्या आधारावर अनेक प्रकारच्या विषमता आढळतात. अस्पृश्यता, जातीय भेदभाव, सामाजिक बहिष्कार, स्त्री-पुरुष असमानता आणि वंचित घटकांवरील अन्याय या समस्या अजूनही पूर्णपणे संपलेल्या नाहीत. अशा परिस्थितीत सहिष्णुतेचा अर्थ केवळ वेगवेगळ्या समुदायांना एकत्र राहू देणे एवढाच मर्यादित असता कामा नये. प्रत्येक व्यक्तीला समान संधी, सन्मान आणि न्याय मिळवून देण्याची भूमिका त्यामध्ये असली पाहिजे. समाजातील दुर्बल, वंचित, आदिवासी, अल्पसंख्याक, दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांच्या समस्या समजून घेणे आवश्यक आहे. त्यांच्या अनुभवांना महत्त्व देणे आणि त्यांच्या अधिकारांसाठी सकारात्मक भूमिका घेणे ही सामाजिक सहिष्णुतेची खरी कसोटी आहे.

सहिष्णु समाजनिर्मितीमध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षण हे केवळ माहिती आणि ज्ञान संपादन करण्याचे साधन नसून व्यक्तीच्या विचारसरणीला आकार देणारी प्रक्रिया आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये विवेकनिष्ठ विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवेदनशीलता, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित करता येते. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि समाजघटकांविषयी वस्तुनिष्ठ माहिती दिली पाहिजे. विद्यार्थ्यांना परस्परांच्या मतांचा आदर करण्याची, मतभेद शांततेने सोडविण्याची आणि कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला विरोध करण्याची शिकवण मिळाली पाहिजे. वादविवाद, समूहचर्चा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रम यांच्या माध्यमातून सहिष्णुतेची मूल्ये रुजविता येतात. शिक्षकांनी आपल्या वर्तनातून समानता, न्याय, आदर आणि सहकार्याचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवणे आवश्यक आहे. कारण सहिष्णुता ही केवळ पाठ्यपुस्तकातून शिकण्याची गोष्ट नसून दैनंदिन व्यवहारातून आत्मसात करण्याचे जीवनमूल्य आहे.

लोकशाही व्यवस्थेच्या यशासाठीदेखील सहिष्णुता अपरिहार्य आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकाला आपले मत मांडण्याचा, शासनाच्या धोरणांवर टीका करण्याचा आणि सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा करण्याचा अधिकार असतो. मात्र, मतभिन्नता निर्माण झाली म्हणून विरोधकांना शत्रू समजणे ही लोकशाहीविरोधी मानसिकता आहे. लोकशाहीमध्ये विरोधी मतांचा आदर करणे, शांततापूर्ण चर्चा करणे आणि तर्काच्या आधारे मतपरिवर्तन स्वीकारणे आवश्यक असते. राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि सार्वजनिक नेतृत्व यांनी आपल्या भाषणातून आणि कृतीतून सामाजिक सलोखा टिकविण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. मतभेद असणे हे लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे; परंतु मनभेद, द्वेष आणि हिंसाचार निर्माण होणे हे लोकशाहीच्या आरोग्यासाठी घातक आहे. त्यामुळे वैचारिक मतभिन्नतेला संघर्षाचे नव्हे, तर संवादाचे माध्यम बनविणे गरजेचे आहे.

जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या विस्तारामुळे जग जवळ आले आहे. विविध देशांतील लोकांचे विचार, संस्कृती आणि जीवनशैली यांच्याशी परिचित होण्याच्या संधी वाढल्या आहेत. त्याचबरोबर सांस्कृतिक गैरसमज, धार्मिक पूर्वग्रह, वांशिक भेदभाव आणि असहिष्णुतेच्या घटनाही अनेक ठिकाणी दिसून येतात. स्थलांतरित नागरिक, निर्वासित आणि अल्पसंख्याक समुदायांना अनेकदा सामाजिक पूर्वग्रहांचा सामना करावा लागतो. वंश, त्वचेचा रंग, राष्ट्रीयत्व किंवा सांस्कृतिक ओळख यांच्या आधारावर व्यक्तीचे मूल्यमापन करणे ही अन्यायकारक प्रवृत्ती आहे. जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रांमध्ये सहकार्य, संवाद आणि परस्पर आदर आवश्यक आहे. युद्ध, दहशतवाद, धार्मिक कट्टरता आणि हिंसक संघर्ष यांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन उद्ध्वस्त होते. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन मानवतेच्या समान मूल्यांची आठवण करून देतो.

डिजिटल युगामध्ये सहिष्णुतेसमोर नवीन आव्हाने निर्माण झाली आहेत. समाजमाध्यमांमुळे प्रत्येक व्यक्तीला आपले मत व्यक्त करण्यासाठी व्यापक व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. मात्र, त्याच माध्यमांचा वापर करून अफवा, द्वेषपूर्ण संदेश, दिशाभूल करणारी माहिती आणि अपमानास्पद मजकूर पसरविला जात आहे. अनेकदा एखाद्या घटनेची सत्यता पडताळून न पाहता संदेश पुढे पाठविले जातात. धार्मिक, जातीय किंवा राजकीय विषयांवरून समाजमाध्यमांमध्ये परस्परांविषयी द्वेष निर्माण केला जातो. आभासी जगातील अशा वर्तनाचे परिणाम प्रत्यक्ष सामाजिक जीवनावर होऊ शकतात. त्यामुळे डिजिटल सहिष्णुता ही काळाची गरज बनली आहे. समाजमाध्यमांवर मत व्यक्त करताना भाषेचे भान ठेवणे, दुसऱ्याच्या प्रतिष्ठेचा आदर करणे, माहितीची सत्यता तपासणे आणि द्वेषपूर्ण मजकूर प्रसारित न करणे आवश्यक आहे. अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ दुसऱ्याचा अपमान करण्याचे स्वातंत्र्य असा होत नाही. जबाबदार डिजिटल नागरिकत्व हे सहिष्णु समाजाच्या निर्मितीचे महत्त्वाचे साधन आहे.

कुटुंब ही सहिष्णुतेची पहिली पाठशाळा आहे. मुलांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कुटुंबातील वातावरणातून होत असते. पालकांनी मुलांना लहानपणापासूनच सर्व व्यक्तींशी आदराने वागण्याची शिकवण दिली पाहिजे. घरामध्ये मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव न करणे, घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या अनुभवांचा आदर करणे, लहानांच्या मतांना महत्त्व देणे आणि कुटुंबातील मतभेद संवादातून सोडविणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या व्यक्तींशी मैत्री करण्यास मुलांना प्रोत्साहन दिले पाहिजे. दुसऱ्याच्या अडचणी समजून घेणे, गरजू व्यक्तींना मदत करणे आणि कोणाचाही अपमान न करणे या सवयी बालपणापासून विकसित झाल्या, तर भविष्यात संवेदनशील नागरिक घडू शकतात. सहिष्णुता ही केवळ सार्वजनिक जीवनापुरती मर्यादित नसून कुटुंबातील नातेसंबंध अधिक सुदृढ करणारी भावना आहे.

स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीनेही सहिष्णुतेचे महत्त्व अधोरेखित करावे लागते. महिलांना शिक्षण, रोजगार, राजकीय सहभाग, निर्णयप्रक्रिया आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांमध्ये समान संधी मिळणे आवश्यक आहे. स्त्रियांच्या विचारांना, आवडीनिवडींना आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाला मान्यता देणे ही सहिष्णुतेचीच अभिव्यक्ती आहे. त्याचप्रमाणे तृतीयपंथीय व्यक्ती, दिव्यांग व्यक्ती आणि समाजातील इतर दुर्लक्षित घटक यांच्या अस्तित्वाचा व अधिकारांचा स्वीकार करणे गरजेचे आहे. व्यक्तीच्या शारीरिक स्थिती, लिंगभाव, सामाजिक ओळख किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारे तिच्याशी भेदभाव केला जाऊ नये. समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगता यावे, यासाठी सार्वजनिक सुविधा, शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. सहिष्णुता आणि समावेशकता यांचा समन्वय साधल्याशिवाय सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकत नाही.

आर्थिक आणि सामाजिक विषमता कमी करण्यासाठीही सहिष्णु दृष्टिकोन आवश्यक आहे. समाजातील श्रीमंत आणि गरीब, शहरी आणि ग्रामीण, शिक्षित आणि अशिक्षित तसेच विकसित आणि अविकसित भागांतील अंतर कमी करणे ही सामूहिक जबाबदारी आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींकडे तुच्छतेने पाहण्याऐवजी त्यांच्या परिस्थितीमागील सामाजिक आणि आर्थिक कारणे समजून घेतली पाहिजेत. रोजगार, आरोग्य, शिक्षण, निवारा आणि सामाजिक सुरक्षा या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी शासनाबरोबरच सामाजिक संस्थांनीही पुढाकार घेतला पाहिजे. सहिष्णु समाज हा केवळ विविधतेचा स्वीकार करणारा नसतो, तर प्रत्येक व्यक्तीला प्रगतीची समान संधी मिळावी यासाठी प्रयत्न करणारा समाज असतो. त्यामुळे सहिष्णुतेचा संबंध सामाजिक उत्तरदायित्व आणि कल्याणकारी विकासाशीही जोडलेला आहे.

सहिष्णुता वाढविण्यासाठी शासन, शैक्षणिक संस्था, प्रसारमाध्यमे, सामाजिक संघटना आणि नागरिक यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रसारमाध्यमांनी सामाजिक प्रश्न मांडताना वस्तुनिष्ठता आणि जबाबदारीचे भान राखले पाहिजे. विविध समुदायांमधील सकारात्मक उपक्रम, सामाजिक सहकार्य आणि एकात्मतेच्या उदाहरणांना प्रसिद्धी दिली पाहिजे. सामाजिक संस्थांनी आंतरधर्मीय संवाद, सांस्कृतिक देवाणघेवाण, युवक शिबिरे आणि जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत. सार्वजनिक ठिकाणी भेदभावविरहित वर्तनाला प्रोत्साहन दिले पाहिजे. द्वेषपूर्ण भाषण, सामाजिक बहिष्कार आणि हिंसक प्रवृत्ती यांना कायद्याच्या चौकटीत प्रतिबंध करणेही आवश्यक आहे. सहिष्णुतेचे मूल्य समाजात रुजविण्यासाठी केवळ एका दिवसाचे कार्यक्रम पुरेसे नसून त्याची अंमलबजावणी दैनंदिन जीवनात होणे महत्त्वाचे आहे.

आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन हा प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या विचारांचे आणि वर्तनाचे आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या घरात, कार्यस्थळी, शैक्षणिक संस्थेत आणि सार्वजनिक जीवनात इतरांशी कसे वागतो, याचा विचार करणे आवश्यक आहे. आपल्यापेक्षा वेगळे विचार मांडणाऱ्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकण्याची तयारी आहे का, सामाजिक आणि सांस्कृतिक विविधतेचा आपण आदर करतो का, भेदभावाच्या घटनांविरुद्ध आपण भूमिका घेतो का आणि समाजात सलोखा निर्माण करण्यासाठी आपले योगदान काय आहे, असे प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारले पाहिजेत. सहिष्णुतेची सुरुवात व्यक्तीच्या मनातून होते आणि तिचा विस्तार कुटुंब, समाज, राष्ट्र आणि संपूर्ण जगापर्यंत होतो. छोट्या-छोट्या कृतींमधूनही मोठे सामाजिक परिवर्तन घडविता येते. आज मानवजातीला विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासाबरोबरच मानवी संवेदनशीलतेचीही नितांत गरज आहे. भौतिक प्रगतीच्या शर्यतीत माणुसकी, परस्पर आदर आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये मागे पडता कामा नयेत. विचारांमधील विविधता ही संघर्षाचे कारण न बनता ज्ञानवृद्धी आणि सामाजिक प्रगतीचे साधन ठरली पाहिजे. कोणत्याही व्यक्तीची ओळख तिच्या जात, धर्म, भाषा, लिंग किंवा आर्थिक स्थितीवरून ठरविण्याऐवजी तिच्या माणूसपणाच्या आधारे केली पाहिजे. सहिष्णुता ही शांततेची पूर्वअट, लोकशाहीची शक्ती आणि सामाजिक न्यायाचा महत्त्वपूर्ण आधार आहे. आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिनाच्या निमित्ताने विविधतेचा आदर, मतभिन्नतेचा स्वीकार, अन्यायाविरुद्ध संघर्ष आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. कारण सहिष्णुतेतूनच विश्वास निर्माण होतो, विश्वासातून बंधुभाव वाढतो आणि बंधुभावातून शांततापूर्ण, समताधिष्ठित व मानवतावादी समाजाची निर्मिती होते. विविधतेचा आदर, विचारांचा स्वीकार आणि माणुसकीचा सन्मान हाच सहिष्णु समाजाचा खरा पाया आहे.



डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

मोहोळ नागरी सहकारी पतपुरवठा...

सत्कार न राहता जुन्या आठवणींमधून आपुलकीचे दर्शन घडविणारा हा क्षण उपस्थितांसाठी विशेष ठरला.

प्रा. दिलीप देशपांडे सर यांच्या अमृतमहोत्सवी अर्थात पंच्याहत्तरीच्या वाढदिवसानिमित्त त्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. राजन पाटील आणि प्रा. देशपांडे यांनी एकत्रितपणे जुन्या आठवणींना उजाळा देत आपल्या सहवासातील अनेक प्रसंगांची आठवण जागवली. त्यांच्या संवादातून परस्परांमधील जिव्हाळा आणि दीर्घकाळ टिकून राहिलेल्या मैत्रीचे दर्शन घडले.

'लोकनेते नांगर'चा प्रवास परदेशापर्यंत!

या सोहळ्यात उद्योजक विष्णू थिटे यांचाही विशेष गौरव करण्यात आला. जिल्हा ग्रामीण उद्योगाच्या माध्यमातून त्यांना केंद्र सरकारच्या वतीने पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल हा सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे, २६ जानेवारी २०२७ रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

अनगरसारख्या ग्रामीण भागात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुरू केलेल्या 'लोकनेते नांगर' या उद्योगाने

एस.व्ही.सी.एस. प्रशालेत माजी विद्यार्थी स्नेह मेळावा उत्साहात

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- अक्कलकोट रोडवरील एस.व्ही.सी.एस. हायस्कूल, एमआयडीसी प्रशालेतील सन २००६ च्या इयत्ता दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात पार पडला.



प्रथम सरस्वती मातेचे, श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व श्री तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुभाष धुमशेट्टी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक केदार माळी, मुख्याध्यापक धनंजय नकाते, सेवानिवृत्त पर्यवेक्षक सिद्रामप्पा उपासे, ज्येष्ठ शिक्षक लक्ष्मण यादव यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मल्लिकार्जुन गुरव, राजशेखर व्हनकडे, महेश घोंगडे, अप्पासाहेब पाटील, विजयकुमार बगले, प्रकाश गुरव, महेश कोरे, संगिता पाटील, विजया बिराजदार आदी शिक्षक व सेवानिवृत्त सेवक मल्लिनाथ म्हमाणे आदी उपस्थित होते.

यावेळी माजी विद्यार्थ्यांनी गुरुंची पाद्यपूजा करून आशीर्वाद घेतला. सर्व शिक्षकांचा फेटा बांधून व गुलाब पुष्प देऊन स्वागतपर सत्कार करण्यात आला. उपस्थित ८६ माजी विद्यार्थ्यांनी स्वतःची ओळख सांगताना शाळेतील आठवणींना उजाळा दिला.

यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक धुमशेट्टी म्हणाले, वीस वर्षापूर्वी शाळेत असताना शिक्षकांनी चांगले संस्कार केले. आता तुम्ही विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहात. आई-वडील, शिक्षक व संस्थेचे नाव लौकिक करीत आहात, ही गोष्ट अभिमानास्पद आहे.

मुख्याध्यापक नकाते म्हणाले, आजच्या धावपळीच्या जीवनातही स्नेह मेळावा आयोजित करून पुढच्या पिढीपुढे आदर्श ठेवल्याबद्दल शाळेच्यावतीने कौतुक केले.

यावेळी सर्व माजी शिक्षकांनी मनोगतातून स्नेह मेळाव्यातून शिक्षक व विद्यार्थ्यांचे ऋणानुबंध कायम मनात असल्याचे सांगितले.

राष्ट्रगीताने मेळाव्याची सुरुवात झाली. यावेळी माजी वर्गशिक्षक मल्लिकार्जुन गुरव यांनी विद्यार्थ्यांची हजेरी घेतली. माजी विद्यार्थ्यांनी राखी पौर्णिमा सण साजरा केला. वीरतपस्वी मंदिरात सहल काढली. विविध मनोरंजनाचे खेळ खेळले. विविध आठवणीत रममाण झाले.मुंबई, पुणे, गुलबर्गा, कोल्हापूर, विजापूर व सोलापूर शहर जिल्ह्यातून माजी विद्यार्थी आल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. मेळावा यशस्वी होण्यासाठी शरणू हांडे, अनिल म्हेत्रे, डिंपल धनवले, रेखा हळ्ळद आदी माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. वंदे मातरमने मेळाव्याची सांगता करण्यात आली. मेळाव्याचे सूत्रसंचालन रेश्मा वदगा,सुरेखा ऐक्कलदेवी यांनी केले.

महाराष्ट्राच्या नावाने वादग्रस्त चित्रपट कशाला ?

'महाराष्ट्र एपिस्टीन फाईल' मधून महाराष्ट्र शब्द वगळा!

संभाजी ब्रिगेडची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्राची ओळख ही छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वाभिमान, महात्मा फुले यांची सामाजिक क्रांती, राजर्षी शाहू महाराजांची समता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची आहे. अशा पुरोगामी महाराष्ट्राच्या नावाचा वापर वादग्रस्त विषयाशी संबंधित चित्रपटासाठी कशाला ? असा सवाल उपस्थित करत प्रस्तावित ह्यमहाराष्ट्र एपिस्टीन फाईल' या चित्रपटाच्या शीर्षकातून 'महाराष्ट्र' हा शब्द वगळण्याची मागणी संभाजी ब्रिगेडने केली आहे. यासंदर्भात प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे यांनी मंगळवारी (दि. १०) थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे. ही माहिती संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सचिन जगताप यांनी दिली.

प्रस्तावित चित्रपटाच्या नावात महाराष्ट्र हा शब्द जोडण्यावर संभाजी ब्रिगेडने तीव्र आक्षेप घेतला आहे. महाराष्ट्राची अस्मिता



आणि ऐतिहासिक विचारपरंपरा यांचा सन्मान राखणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. महिलांच्या लैंगिक शोषणासारख्या गंभीर आणि संतापजनक विषयावर चित्रपटाच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा प्रयत्न होत असेल, तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. मात्र, अशा संवेदनशील आणि वादग्रस्त विषयाला महाराष्ट्राचे नाव जोडणे योग्य नाही, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.

खरात प्रकरणासारख्या घटनांमधून महिलांच्या शोषणाचे गंभीर वास्तव समोर आले आहे. शेकडो महिलांच्या लैंगिक शोषणाच्या आरोपांमुळे समाजमन सुन्न झाले आहे. अशा विकृतींना आळा घालण्यासाठी जनजागृती होणे गरजेचे आहे. मात्र, या घटनांचा संदर्भ देताना संपूर्ण महाराष्ट्राच्या नावाला वादग्रस्त कथानकाशी जोडणे म्हणजे राज्याच्या अस्मितेला धक्का पोहोचविण्याचा प्रकार असल्याचे संभाजी ब्रिगेडचे म्हणणे आहे.

चित्रपटाला विरोध नाही, महाराष्ट्राच्या नावाच्या वापराला आक्षेप!

संभाजी ब्रिगेडची भूमिका स्पष्ट आहे. महिलांच्या शोषणासारख्या गंभीर विषयावर चित्रपट निर्माण करण्यास संघटनेचा विरोध नाही. उलट अशा विषयांवर समाजप्रबोधन होणे आवश्यक आहे. मात्र, चित्रपटाच्या शीर्षकात महाराष्ट्र या शब्दाचा अनावश्यक वापर का करण्यात आला, याची चौकशी झाली पाहिजे. कथानकाला महाराष्ट्र हे नाव जोडण्यामागील नेमका उद्देश तपासावा आणि चित्रपट निर्माते व दिग्दर्शकांना पयार्यी शीर्षक निवडण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

तसेच मुख्यमंत्र्यांनी या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती लेखी स्वरूपात द्यावी, अशीही मागणी मनोज आखरे यांनी केली आहे.

दरम्यान, महाराष्ट्राची ओळख एखाद्या व्यक्तीच्या कथित विकृतीने किंवा एखाद्या गुन्हेगारी प्रकरणाने ठरत नाही. महाराष्ट्राच्या नावाचा वापर करताना त्यामागील संदर्भ आणि सामाजिक परिणामांचाही विचार झाला पाहिजे. चित्रपट निर्मितीच्या स्वातंत्र्याचा आदर राखतानाच राज्याच्या अस्मितेचा प्रश्नही गांभीर्याने घेतला पाहिजे, अशी भूमिका सचिन जगताप यांनी 'कटूसत्य'शी बोलताना मांडली.

आता राज्य सरकार या मागणीची दखल घेऊन चित्रपटाच्या शीर्षकाबाबत काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह उत्साहात साजरा

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर यांच्यावतीने जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.



या निमित्ताने आदिवासी लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांच्या लाभांचे वितरण, गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या महिला बचत गटांना निवडपत्र व धनादेश वितरण तसेच आदिवासी नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन अपर जिल्हाधिकारी गणेश निन्हाळी यांच्या हस्ते क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना अपर जिल्हाधिकारी श्री. निन्हाळी म्हणाले, आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ समाजातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी घ्यावा. विशेषतः महिला, विद्यार्थी व महिला बचत गटांसाठी असलेल्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासाच्या योजनांचा लाभ घेऊन प्रगती साधावी. आदिवासी समाजातील कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी पालकांनी शासनाच्या शैक्षणिक योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त सर्व आदिवासी बांधवांना शुभेच्छा दिल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील गडचिरोली येथे हा कार्यक्रम संपन्न होत असल्याबद्दल त्यांनी आनंद व अभिमान व्यक्त केला.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्याचे स्मरण करणे, आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास जतन व प्रसारित करणे, समाजाचे आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक सक्षमीकरण करणे तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील आदिवासी बांधवांपर्यंत पोहोचविणे हा आहे.

प्रास्ताविकात प्रकल्प संचालक धनंजय झाकर्डे यांनी सोलापूर व धाराशिव जिल्ह्यांतील आदिवासी समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. आदिवासी पारधी समाजातील मुले-मुली शिक्षणापासून वंचित राहू नयेत, यासाठी तीन आश्रमशाळा, एक सैनिक शाळा, दोन नामांकित शाळा आणि सहा वसतिगृहे कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी गणेश निन्हाळी, प्रकल्प संचालक धनंजय झाकर्डे, कार्यालय अधीक्षक सुधाकर भांगरे, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक प्रदीप समुद्रे, आदिवासी समाजातील वैजू काळे, राजेश काळे, ज्ञानेश्वर भोसले, चव्हाण, ॲड. बबीता काळे, सामाजिक कार्यकर्त्या पार्वती काळे, ॲड. नितीन शिंदे, शाहीर शिंदे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व समारोप आश्रमशाळेचे मुख्याध्यापक प्रदीप समुद्रे यांनी केला.

कार्तिक यात्रा सोहळा; पालखी सोहळा, दिंडीधारकांनी प्लॉटसची मागणी नोंदवावी - प्रांताधिकारी सचिन इथापे



पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- कार्तिक यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि. 21 नोव्हेंबर 2026 रोजी असून, यात्रा कालावधी 10 ते 24 नोव्हेंबर 2026 असा आहे. या यात्रेत येणाऱ्या दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (65 एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या ठिकाणी मोफत प्लॉटस भाविकांना तंबू, राहुट्या उभारुन वास्तव्य करण्यासाठी देण्यात येत आहेत. दि.14 नोव्हेंबर पासून प्लॉट नोंदणी सुरु करण्यात आली आहे. संबधितांनी भक्तीसागर येथे प्लॉटची मागणी नोंदवावी, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे.

कार्तिक यात्रेला येणाऱ्या पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर (65 एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात.. या ठिकाणी एकूण 725 प्लॉट्स उपलब्ध असून, सदर प्लॉट भाविकांना निवाऱ्यासाठी दिले जातात. या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते. येथे प्रशासकीय यंत्रणा सुसज्ज व सुरळीतपणे काम करण्यासाठी तहसीलदार सचिन मुळीक यांची सेक्टर मॅनेजर म्हणून नियुक्ती केली आहे.भाविकांना प्लॉटस वाटप करणे, अडीअडचणी सोडवणे, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व त्यावर नियुक्त सेक्टर मॅनेजर व त्याचे अधिनस्त कर्मचारी कार्यान्वित असणार आहेत.

दिंडी, पालखी समवेत येणाऱ्या भाविकांना भक्तीसागर 65 एकर येथे प्लॉटसचे वाटप करण्यात येणार आहे. आषाढी एकदशीच्या सोहळ्या अगोदर दिंडी, पालखीतील भाविकांने प्लॉटसाठी मागणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रथम येणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या ठिकाणी भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार असून आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसिलदार सुधाकर धाईंजे (मो.क्र.9767248210), तसेच ग्राम महसूल अधिकारी दादासाहेब पाटोळे (मो.क्र.9970109919), प्रमोद खंडागळे (मो.क्र. 9657290403) तसेच वैभव कट्टे (मो.क्र.9665076066) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

फोन क्र. (०२१८६) २२३२५३,२२३०१३ फॅक्स क्र.(०२१८६)२२३००६

ई मेल:- comcpandharpur@gmail.com

जा.क्र/पंनपं/पा.पु./ई निविदा/५४७२/२०२६ दि. १३/११/ २०२६

पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर

ई निविदा फेर सुचना क्र. ०१

नगरपरिषद पंढरपूर मार्फत न.प.फंड अंतर्गत पाणीपुरवठा विषयक ०१ कामांकरिता शासनाकडील योग्य त्या विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मक्तेदार यांचे कडुन महाराष्ट्र शासनाच्या पोर्टलवर ई निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना, तांत्रिक तपशील, अटी व शर्ती इत्यादी शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. यापुढील सर्व सुचना व शुध्दीपत्रके इत्यादी वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

- ई निविदा प्रणालीवर प्रपत्र उपलब्ध होण्याची तारीख :- १६/११/२०२६
- निविदा भरण्याची अंतिम तारीख :- २३/११/२०२६
- निविदा उघडण्याची तारीख (शक्य असल्यास) :- २५/११/२०२६

(महेश रोकडे)
मुख्याधिकारी
नगरपरिषद पंढरपूर

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)

अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
सिक्युरिटी गार्ड
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू




जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.
मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर
संपर्क - 9422602337, 8317212037

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) सतत कार्यरत राहणारा एक छोटा जीव २) एक उपदिशा ३) रात्रीच्या वेळचे जेवण (इंग्रजीत) ४) हिंदी चित्रपट निर्माता-** चोप्रा ५) इंदिरा गांधींच्या आईचे नाव-*** नेहरू ६) भीती (हिंदीत) ७) पोस्ट, पत्र ९) रंगिला चित्रपटातील महाराष्ट्रीयन अभिनेत्री १०) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष संक्षिप्तमध्ये लिहा-*** ११) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो १२) संशय (हिंदीत) १३) मंत्र्यांच्या नावापुढे येणारे विशेषण १४) शक्तीमान, ताकद असलेला १५) वृक्षाच्या मुळ्या आणि फांद्या यांच्यामधील भाग १८) चिंच (हिंदीत) २०) क्रिकेट स्पर्धेसाठी वापरला जाणारा चेंडू-*** बॉल २१) महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर २५) नक्कल करणारा २७) एक म्हण-****** अक्कल नसते २८) श्रीरामाचा एक बंधू ३०) ख्रिश्चन धर्मसेविका ३२) नजीक, समीप ३४) हा चिरताना डोळ्यात पाणी येते ३५) यशाचे सूत्र, गुपित ३६) देवाचे चिंतन, नमस्कार ३७) पध्दत, रीत (हिंदीत) ३९) हिंदी न्यूज चॅनेल-** तक ४१) क्षण (हिंदीत) ४२) फर्निचरसाठी या वृक्षाचे लाकूड वापरतात

आडवे शब्द : १) आयपीएलमधील अंबानींचा संघ ५) चवीला कडू असे ८) शन उलट लिहा ९) वय (हिंदीत) १०) प्रतिष्ठीत, सन्माननीय १२) जुन्या हिंदी चित्रपटातील एक अभिनेत्री-*** टागोर १३) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पत्र्याची पट्टी १४) दह्यात पाणी मिसळून बनविलेले पेय १५) सर्दी बरोबर हा येतो १६) बशीचा जोडीदार १७) क्रिकेटमध्ये गोलंदाजाने बाहेरच्या बाजूस टाकलेला चेंडू, रूंद (इंग्रजीत) १९) तहसीलदार २१) शपथ (हिंदीत) २२) वस्तूचे मूल्य, भाव २३) गोधडी २४) मग्न, एकरूप २६) टेकडी (हिंदीत) २९) मुलाची पत्नी, स्नुषा ३१) लाकूड कापताना होणारा आवाज ३२) जीभ, दिलेला शब्द (हिंदीत) ३३) एक दाक्षिणात्य सुपरस्टार अभिनेता ३५) गाणे गाणारा, गायक ३६) होकारच्या विरूध्दार्थी ३८) कपड्यावरील कचरा घाण ३९) आंब्याचा रस ४०) त्रास, फ्ल्यू (मराठीत) ४३) सलमान, संजय दत्त आणि माधुरी दीक्षित अभिनीत एक चित्रपट ४४) मुंबईतील हा गणपती प्रसिध्द आहे-**** चा राजा

सुडोकु - 96

	4	9		3	1			
	3			7		9	8	
8				4				
		6	1	5	7	8		2
	5		2	8	4	1		6
	1							5
	8	5	7		3	4		9
		2			5	3	7	
		4		2		5		1

मदतीचे धोरण हेच शिवसेनेचे तोरण हा विचार घेऊन एक हजार महिलांना आनंदाचा शिधा वाटप

नातेपुते (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट असताना संकटात सापडलेल्या शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीच्या निमित्ताने आनंद फुलविण्यासाठी मदतीचे धोरण हेच शिवसेनेचे तोरण



हा विचार घेऊन शिवसेनेचे सोलापूर जिल्हा ओबीसी प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी शिवसेना भवन, नातेपुते येथे खासदार ज्योतीताई वाघमारे यांच्या हस्ते शेतकरी सेवा केंद्राचे उद्घाटन करून माळशिरस तालुक्यातील एक हजार शेतकरी महिलांना राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने लाडक्या बहिर्णींसाठी पाठविण्यात आलेल्या 'आनंदाचा शिधा'चे वाटप खासदार ज्योतीताई वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले .या उपक्रमामुळे दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकरी कुटुंबांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न शिंदे गटाच्या शिवसेनेकडून करण्यात आला.यावेळी बोलताना खासदार ज्योतीताई वाघमारे म्हणाल्या की, महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून सोलापूर जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांनाही दुष्काळाचा फटका बसला आहे. खासदार झाल्यानंतर माझी ही पहिलीच दिवाळी असून ती दुष्काळाच्या सावटाखाली आली आहे. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार ही दिवाळी घरात साजरी न करता शेतकऱ्यांच्या बांधावर, शेतमजुरांच्या सोबत आणि बळीराजाच्या सान्निध्यात साजरी करण्याचा मी संकल्प केला आहे.महाराष्ट्रभर हजारो ट्रकच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकरी आणि बळीराजासाठी आनंदाचा शिधा पाठविण्यात आला आहे. 'मदतीचे धोरण हेच शिवसेनेचे तोरण' हा विचार घेऊन शिवसेना आज जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होत आहे. भगवा खांद्यावर घेऊन शिवसैनिक केवळ राजकारण करत नाहीत, तर बळीराजाच्या बांधावर जाऊन त्याच्या संकटात मदतीचा हात देतात, हे या उपक्रमातून दिसून येत आहे असल्याचे प्रतिपादन खासदार ज्योतीताई वाघमारे यांनी केले तसेच त्यांनी सांगितले की,

मी राज्यभर दौरे करत असताना माळशिरस तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती अनुभवली. महिलांच्या चेहऱ्यावर आनंदाऐवजी चिंतेच्या रेषा दिसत होत्या. मात्र, एकनाथ शिंदे साहेब या लाडक्या भावाचे नाव घेताच महिलांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. यावरून शिंदे साहेबांवर लाडक्या बहिर्णींचा किती मोठा विश्वास आहे, हे स्पष्ट होते. त्याच लाडक्या भावाने पाठविलेला आनंदाचा शिधा आपल्या मुलाबाळांसाठी आणि कुटुंबासाठी घेऊन मी आज येथे आले आहे. हा केवळ शिधा नसून संकटाच्या काळात आपल्या पाठीशी कोणीतरी उभे आहे, हा विश्वास देणारा उपक्रम आहे, असेही खासदार वाघमारे यांनी सांगितले.

यावेळी शिवसेनेचे सोलापूर जिल्हाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील म्हणाले की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या शिकवणीनुसार तसेच एकनाथ शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या तत्त्वावर काम करत आहे. 'मदतीचे धोरण हेच शिवसेनेचे तोरण' हा विचार प्रत्यक्ष कृतीतून उतरविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

माळशिरस तालुक्यातील ५५ गावांमधील शेतकरी महिलांना एकत्रित आणून त्यांच्या हातात आनंदाचा शिधा देण्याचा कार्यक्रम खासदार ज्योतीताई वाघमारे यांच्या माध्यमातून आयोजित केला आहे. महिलांच्या हातात हा शिधा दिल्यानंतर त्या तो आपल्या लेकराबाळांसाठी घरी घेऊन जातील आणि आपल्या कुटुंबाची दिवाळी गोड करतील. आज शेतकऱ्यांवर मोठे संकट आहे; मात्र एकनाथ शिंदे साहेबांचा हात तुमच्या पाठीशी आहे आणि प्रत्येक शिवसैनिक तुमच्या सुख-दुःखात सहभागी आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

एक हजार महिलांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य!

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमात माळशिरस तालुक्यातील ५५ गावांमधील एक हजार शेतकरी महिलांना आनंदाचा शिधा वितरित करण्यात आला. दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर मिळालेल्या या मदतीमुळे उपस्थित महिलांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. राजकीय भाषणांपेक्षा प्रत्यक्ष मदतीच्या माध्यमातून सामान्य कुटुंबांपर्यंत पोहोचण्याचा शिवसेनेचा प्रयत्न या उपक्रमातून दिसून आला.या कार्यक्रमाला सोलापूरचे नगरसेवक प्रदर्शन साठे, ज्येष्ठ नेते शंकरराव हिवरकर पाटील, भीमराव भुसणार, तानाजीराव भोळे, दादासाहेब लोखंडे, भाजपचे युवा नेते मनोज जाधव, तेजस गोरे, सुनील बनकर, चेअरमन रंजीत जठार, लालासाहेब मोटे, दत्ताभाऊ गोरे, संग्राम हिवरकर पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिवसैनिक आणि मोठ्या संख्येने शेतकरी महिला उपस्थित होत्या.दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात देत त्यांच्या घरात आनंदाची दिवाळी साजरी व्हावी, या भावनेतून राबविण्यात आलेला या उपक्रमाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लाडक्या महिला भगिनींकडून स्वागत करत कौतुक होत आहे.

कार्तिकी यात्रेसाठी पंढरपुरातील अतिक्रमणे हटवून स्वच्छतेला प्राधान्य द्या - जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- कार्तिकी शुद्ध एकादशी शनिवार, दि. 21 नोव्हेंबर रोजी असून, कार्तिकी यात्रा कालावधी 10 ते 24 नोव्हेंबर असा आहे. या कालावधीत सुमारे 12 ते 13 लाख भाविक पंढरपुरात येण्याची शक्यता आहे. यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना वाहतुकीचा कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी शहरातील सर्व अतिक्रमणे हटविण्यासाठी अतिरिक्त पथके नियुक्त करावीत. तसेच चंद्रभागा वाळवंट, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरासह संपूर्ण शहराच्या स्वच्छतेला प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

कार्तिकी यात्रा नियोजनाच्या अनुषंगाने श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्तनिवास येथे आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी अपर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी सिताराम डुबल, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, जिल्हा नगर प्रशासन अधिकारी आशिष लोकरे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पंकज कुंभार, मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



यात्रा कालावधीत भाविकांना मुबलक व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासह शहरातील स्वच्छतेची योग्य व्यवस्था करावी. अनधिकृत होर्डिंग तातडीने हटवावेत. वाहनतळांच्या ठिकाणी मुरमीकरण करून पुरेशी प्रकाशव्यवस्था करावी. सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या स्वच्छतेसाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करावेत. भक्तिसागर येथे वारकरी व भाविकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी नगरपालिका प्रशासनाला दिल्या.

मंदिर समितीने दर्शनरांगेतील बॅरिकेडिंग सुस्थितीत ठेवावे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी जर्मन हँगर उभारून त्यामध्ये पिण्याचे पाणी, भोजन, सुलभ शौचालये आणि मॅटची व्यवस्था करावी. आरोग्य विभागाने पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवून अतिरिक्त खाटांची व्यवस्था करावी, तसेच आरोग्यदूतांची नियुक्ती करावी, असे निर्देशही त्यांनी दिले. वाखरी येथे यात्राकाळात मोठ्या प्रमाणात जनावरांचा बाजार भरत असल्याने पशुवैद्यकीय विभागाने स्वतंत्र पथक नियुक्त करून जनावरांचे लसीकरण, औषधोपचार तसेच जनावरे आणि पशुपालकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, असेही त्यांनी सांगितले.

चौपाळा ते शिवाजी चौक या दरम्यान रिक्षांची गर्दी होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे प्रादेशिक परिवहन विभागाने तातडीने आवश्यक कारवाई करावी. अन्न व औषध प्रशासनाने स्वतंत्र पथके नियुक्त करून शहरातील तसेच परिसरातील खाद्यपदार्थ विक्री केंद्रे आणि दूध विक्री केंद्रांची तपासणी करावी.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी. सरगम चौकातील राष्ट्रीय महामार्गाचे सुरू असलेले काम वाहतुकीस अडथळा ठरणार नाही, यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आवश्यक उपाययोजना कराव्यात. महावितरणने अखंडित व सुरक्षित वीजपुरवठा करावा. भाविकांसाठी उपलब्ध असलेल्या गॅस वितरण केंद्रांवर अग्निशमन यंत्रणा सज्ज ठेवावी. राज्य परिवहन विभागाने बसस्थानकात शुद्ध पिण्याचे पाणी व नियमित स्वच्छतेची व्यवस्था करावी, तसेच दगडी पुलावर तात्पुरते बॅरिकेडिंग करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी मंदिर समितीच्या वतीने दर्शनरांग व दर्शनमंडप येथे भाविकांसाठी करण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती दिली. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी नगरपरिषदेमार्फत करण्यात येणाऱ्या व्यवस्थेची माहिती सादर केली.

बैठकीत पाटबंधारे विभाग, राज्य परिवहन विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पंचायत समिती, कृषी उत्पन्न बाजार समिती आदी विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. कार्तिकी यात्रा सुरळीत, सुरक्षित आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी यावेळी दिले.

दुष्काळाच्या संकटात ३५० वनगायींच्या मदतीला शिवसेनेचा धावता हात

नातेपुते (कटूसत्य वृत्त):- पंढरपूर तालुक्यातील बार्डी येथे जवळपास ३५० वनगायी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगत असल्याची माहिती स्थानिक शिवसेना पदाधिकाऱ्यांनी दिल्यानंतर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी वनगायींची उपासमार लक्षात घेऊन पदाधिकाऱ्यांच्या सहकार्यातून तातडीने चाऱ्याची व्यवस्था करण्यात आली.



दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुक्या जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. विशेषतः जंगल परिसरात आणि मोकळ्या क्षेत्रात वास्तव्यास असलेल्या वनगायींना उन्हाळ्यात पुरेसे खाद्य व पाणी मिळणे कठीण होते. पावसाअभावी नैसर्गिक चारा उपलब्ध होत नाही. परिणामी या मुक्या जीवांवर उपासमारीचे संकट ओढवते. अशा परिस्थितीत त्यांना चारा आणि पाणी उपलब्ध करून देणे ही केवळ मदत नसून माणुसकीचे आणि सामाजिक बांधिलकीचे कर्तव्य आहे.

यावेळी आगामी दुष्काळी परिस्थितीत वनगायींच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कशी करता येईल, तसेच भविष्यात चाऱ्याचा तुटवडा निर्माण झाल्यास कोणत्या उपाययोजना करता येतील, याबाबत रोजगार हमी मंत्री भरतशेठ गोगावले यांच्याशी संवाद साधण्यात आला. वनगायींच्या संरक्षणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

यावेळी सोलापूर जिल्हा शिवसेनाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील, ओबीसी महासंघाचे राज्यप्रमुख भीमरावजी भुसनर पाटील, सोलापूर जिल्हा उपप्रमुख दादासाहेब लोखंडे, माळशिरस तालुकाप्रमुख तानाजीराव भोळे पाटील, शिवसेनेचे युवा नेते समर्थ साठे, विद्यार्थी सेनेचे प्रमुख शिवदत्त घोडे, शौकत भाई, खंडू परदेशी, महादेव खंदारे, विलास माळी, विशाल माळी, मस्के, विजय मस्के, बंडू राऊत यांच्यासह शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते.

मुक्या जनावरांची वेदना ओळखून त्यांच्या मदतीसाठी पुढे येणे हीच खरी माणुसकी आहे. दुष्काळात माणसांबरोबरच पशुधन आणि वन्यजीवांचे संरक्षण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

बार्डी येथील वनगायींना देण्यात आलेली चारा मदत ही याच सामाजिक संवेदनशीलतेचे उदाहरण ठरली आहे.

शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणंद रस्ते पोहोचवा व रस्त्यांची कामे दर्जेदार करा- आ. नारायण पाटील

करमाळा, (कटूसत्य वृत्त):- मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ता योजनेची करमाळा विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीची आढावा बैठक (दि.१३ नोव्हें) तहसील कार्यालय, करमाळा येथे आमदार नारायण(आबा) गोविंदराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत करमाळा तालुक्यातील शेत/पाणंद रस्त्यांच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी आमदार पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केवळ कार्यालयीन आढावा न घेता प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाणंद रस्त्यांची पाहणी करण्याच्या सूचना दिल्या. प्रत्येक शेतकऱ्याच्या बांधापर्यंत रस्ता पोहोचला पाहिजे या दृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले. पाणंद रस्त्यांची कामे करताना कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच रस्त्यांची कामे केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात दर्जेदार आणि टिकाऊ झाली पाहिजेत अशा स्पष्ट सूचना आमदार पाटील यांनी प्रशासनाला दिल्या.



पाणंद रस्ते हे शेतकऱ्यांच्या दैनंदिन शेतीकामासाठी अत्यंत महत्त्वाचे असून शेतमालाची वाहतूक, शेती अवजारे आणि इतर सुविधांसाठी त्यांचा मोठा उपयोग होणार आहे. त्यामुळे रस्त्यांच्या कामात अडथळे येऊ नयेत यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांनीही प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहनही आमदार पाटील यांनी केले. यावेळी उपविभागीय दंडाधिकारी माढा विभाग कुर्डूवाडी जयश्री आव्हाड, सहअध्यक्ष दिग्विजय बागल, तहसीलदार करमाळा, गटविकास अधिकारी, पंचायत समिती करमाळा, उपअधीक्षक भूमिअभिलेख, तालुका कृषी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपअभियंता, पोलीस निरीक्षक करमाळा यांच्यासह समिती सदस्य नितीनराजे भोसले यांच्या प्रतिनिधी योगिनीराजे राजेभोसले (वहिनीसाहेब), महेंद्र पाटील, बाबुराव नटके, तात्यासाहेब गोडगे, भागवत मोटे आदी मान्यवर उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत बारमाही वाहतुकीसाठी सक्षम आणि दर्जेदार पाणंद रस्ते उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, असा ठाम निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

कार्तिकी यात्रेत अन्नभेसळ रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश जारी

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- कार्तिकी यात्रा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथे दाखल होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्नपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी प्रशासनाने प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. पंढरपूर शहर व परिसरातील दूध व दुग्धजन्य पदार्थ, बेकरी पदार्थ तसेच हॉटेलमधील खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. कार्तिकी यात्रा सोहळा 10 ते 24 नोव्हेंबर 2026 या कालावधीत होत आहे. या काळात श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी आणि चंद्रभागा स्नानासाठी लाखो भाविक पंढरपुरात येतात. कार्तिकी एकादशीपासून गोपाळकाल्यापर्यंत वारकरी शहरात वास्तव्यास असल्याने त्यांच्या भोजनामध्ये दूध, बासुंदी, खीर यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांचा मोठ्या प्रमाणात समावेश असतो. दूध व दुग्धजन्य पदार्थ लवकर खराब होण्याची शक्यता असते. त्यात भेसळ झाल्यास भाविकांना विषबाधा होऊन त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. यापूर्वीही अशा प्रकारच्या घटना घडल्याने प्रशासनाने यंदा विशेष खबरदारी घेतली आहे. वारकऱ्यांना सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी दूध, दुग्धजन्य पदार्थ व खिचडी आदी खाद्यपदार्थांचे नमुने तपासण्यात येणार आहेत.

या अनुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 मधील कलम 163 (2) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून पंढरपूर शहर व परिसरात अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणे तसेच विषबाधा होण्यास कारणीभूत ठरेल अशी परिस्थिती निर्माण करण्यास प्रतिबंध करणारे आदेश जारी केले आहेत.या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

आंबे येथील विहीर दुर्घटनास्थळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांची भेट



पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- पंढरपूर तालुक्यातील आंबे येथे विहीर खोदकाम सुरू असताना मातीचा ढिगारा कोसळून चार कामगार अडकल्याच्या दुर्घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

विहीर मालक दत्तात्रय निवृत्ती शिंदे यांच्या शेतात जेसीबीच्या साहाय्याने विहीर खोदण्याचे काम सुरू असताना सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास मातीचा ढिगारा कोसळला. यामध्ये मंगेश मोरे (वय ३५), सिद्धेश्वर घाडगे (वय ४५), आबासाहेब घोडके (वय ५०) आणि तानाजी घोडके (वय ५४) हे चार कामगार मातीखाली अडकले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासनासह संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी घटनास्थळी भेट देऊन बचावकायार्ची माहिती घेतली तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून परिस्थितीचा आढावा घेतला.

अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांवर प्रशासनाचे लक्ष असून, बचावकार्याला आवश्यक ती गती देण्याच्या दृष्टीने संबंधित यंत्रणांना सूचना देण्यात आल्या. तसेच जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन यांनी दगड मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नातेवाईकांशी संवाद साधून धीर दिला.

यावेळी त्यांच्यासमवेत अप्पर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे, पंचायत समितीचे सभापती शुभम आगवणे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लावार,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड उपस्थित होते.

हे बचाव कार्य पंढरपूर नगरपालिका अग्निशामक दल, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन, तालुका प्रशासन यांच्यामार्फत सुरू असून, बचाव कार्य साठी एनडीआरएफचे पथक देखील येणार आहे.

आदर्श गुंडचे विभागीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत विजेतेपद; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

कोंडी (कटूसत्य वृत्त):- विजयसिंह मोहिते-पाटील कनिष्ठ महाविद्यालय, कोंडी येथील विद्यार्थी आदर्श गुंड याने १९ वर्षाखालील वयोगटातील विभागीय स्तरावरील सॉफ्ट टेनिस स्पर्धेत विजेतेपद पटकावत घवघवीत यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर त्याची राज्यस्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या विभागीय स्तरावरील सॉफ्ट टेनिस स्पर्धेत आदर्श गुंड याने आपल्या उत्कृष्ट खेळाचे कौशल्य दाखवत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली आणि विजेतेपदावर आपले नाव कोरले.



त्याच्या या दमदार कामगिरीमुळे त्याला राज्यस्तरावर खेळण्याची संधी मिळाली आहे. आगामी राज्यस्तरीय स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल, बारामती येथे होणार आहे.

आदर्शने मिळवलेल्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणेश नीळ, महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले. तसेच आगामी राज्यस्तरीय स्पर्धेतही उज्वल कामगिरी करून महाविद्यालयाचा व कोंडी गावाचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा दिल्या.

आदर्शच्या या यशामुळे विजयसिंह मोहिते-पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, कोंडी परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सिंहगड पब्लिक स्कूलच्या नेत्रा मगरची सॉफ्ट टेनिसमध्ये सुवर्णपदकाला गवसणी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव येथील विद्यार्थिनी नेत्रा मगर हिने सॉफ्ट टेनिस क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. या यशाच्या जोरावर तिची मलकापूर (जि. बुलढाणा) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नेत्राने जिद्द, मेहनत, सातत्य आणि उत्कृष्ट खेळकौशल्याच्या बळावर हे यश संपादन केले. तिच्या या कामगिरीमुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.



नेत्राच्या या यशाबद्दल सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा सिंहगड इन्स्टिट्यूट्स, केगावचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी तिचे अभिनंदन केले.

खेळात यश मिळविण्यासाठी आवश्यक असलेली जिद्द, मेहनत, शिस्त आणि आत्मविश्वास नेत्राने आपल्या कामगिरीतून सिद्ध केला आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेतही तिने अशीच उत्कृष्ट कामगिरी करून शाळेसह संस्थेचा आणि सोलापूर जिल्ह्याचा नावलौकिक उंचवावा, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. विद्यार्थ्यांमधील क्रीडागुणांना वाव देण्यासाठी शाळेकडून नेहमीच प्रोत्साहन आणि योग्य संधी उपलब्ध करून दिली जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, उपप्राचार्या निकहत शेख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नेत्राचे अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. नेत्राला शाळेचे क्रीडाशिक्षक राजू ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्याच्या शाळेच्या परंपरेत नेत्राच्या या यशामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आदर्श गुंडचे विभागीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत विजेतेपद

कोंडी (कटूसत्य वृत्त):- विजयसिंह मोहिते-पाटील कनिष्ठ महाविद्यालय, कोंडी येथील विद्यार्थी आदर्श गुंड याने १९ वर्षाखालील वयोगटातील विभागीय स्तरावरील सॉफ्ट टेनिस स्पर्धेत विजेतेपद पटकावत घवघवीत यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर त्याची राज्यस्तरीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या विभागीय स्तरावरील सॉफ्ट टेनिस स्पर्धेत आदर्श गुंड याने आपल्या उत्कृष्ट खेळाचे कौशल्य दाखवत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली आणि विजेतेपदावर आपले नाव कोरले.

त्याच्या या दमदार कामगिरीमुळे त्याला राज्यस्तरावर खेळण्याची संधी मिळाली आहे.

आगामी राज्यस्तरीय स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल, बारामती येथे होणार आहे.

आदर्शने मिळवलेल्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणेश नीळ, महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले. तसेच आगामी राज्यस्तरीय स्पर्धेतही उज्वल कामगिरी करून महाविद्यालयाचा व कोंडी गावाचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा दिल्या.

आदर्शच्या या यशामुळे विजयसिंह मोहिते-पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, कोंडी परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.